Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# कै. कमलाबाई अजमेरा : एक अविस्मरणीय प्रवास

**डॉ. दिपक विश्वासराव पाटील,** हिंदी विभाग, वे. खा. भ. सेवा मंडळाचे, कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, देवपूर, धुले (महाराष्ट्र-भारत)

**प्रस्तावना**

भारतीय संस्कृतीत महिलांना नेहमीच उच्च स्थान देण्यात आले आहे.

"यत्र नार्यस्तु पूज्यन्ते
रमन्ते तत्र देवता"

या वचनाने भारताच्या महिलांचा इतिहास पाहता त्यांच्या सन्मानाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. अनेक महिलांनी विविध क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांचे धैर्य, कर्तुत्व आणि निष्ठा यामुळे त्या त्या प्रेरणादायी ठरल्या आहेत. वेदकाळात महिलांना समाजात मानाचे स्थान होते. त्या शिक्षण, धर्म, प्रशासन, तसेच तत्त्वज्ञानात पुढे होत्या. गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्रा यांसारख्या विदुषी स्त्रियांनी वेद आणि उपनिषदांमध्ये आपले योगदान दिले. राजमाता गौतमीबाळा आणि राणी दिद्दा या स्त्रिया उत्तम प्रशासक होत्या. तसेच, प्राचीन काळातील अनेक स्त्रियांना युद्धकलेत पारंगत होण्याची संधी मिळाली होती.

मध्ययुगात महिलांना अनेक सामाजिक बंधनांना सामोरे जावे लागले, तरीही काही महिलांनी इतिहास घडवला .चित्तोडगडच्या राणी पद्मिनी यांनी आपल्या स्वाभिमानासाठी जोहार केला, ज्यामुळे त्यांचे शौर्य अमर झाले .दिल्लीच्या सिंहासनावर विराजमान होणाऱ्या पहिल्या मुस्लिम महिला शासक रझिया सुलतान यांनी आपल्या धैर्याने पुरुषप्रधान समाजात स्वतःचे स्थान निर्माण केले .१८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामात राणी लक्ष्मीबाई यांनी पराक्रमाने लढा दिला आणि हे "मी माझी झाशी देणार नाही" .शब्द अजरामर केलेमाळवा राज्याच्या उत्तम प्रशासक असलेल्या अहिल्याबाई होळकर यांनी अनेक मंदिरे आणि सार्वजनिक कल्याणकारी प्रकल्प उभारले.

भारतातील स्वातंत्र्यलढ्यात महिलांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली .सरोजिनी नायडू भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या महिला अध्यक्षा होत्या आणि भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल बनल्या . अरुणा आसफ अली १९४२ च्या आंदोलनात त्या अग्रस्थानी होत्या आणि त्यांनी क्रांतिकारी "भारत छोडो" .विचारांना चालना दिलीकमला नेहरू आणि कस्तुरबा गांधी या दोघींनी महात्मा गांधींसोबत सत्याग्रह आणि स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला .भगतसिंह यांच्या मातोश्री विद्यावती आणि झुंझार नायिका दुर्गाबाई देशमुख यांनी सशस्त्र क्रांतीसाठी योगदान दिले.

आधुनिक भारतातील महिलांचे यश कल्पना चावला आणि सुनीता विल्यम्स या दोघींनी अंतराळशास्त्रात भारताचे नाव उज्वल केले .किरण बेदीभारतातील पहिल्या महिला आयपीएस अधिकारी म्हणून त्यांनी कायदा आणि सुव्यवस्थेत मोठे योगदान दिले .इंदिरा गांधी आणि प्रतिभा पाटील इंदिरा गांधी भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान तर प्रतिभाताई पाटील भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून त्यांनी देशाचे नेतृत्व केले .मिताली राज आणि पी सिंधू .व्ही.क्रीडाक्षेत्रात महिलांनी मोठी झेप घेतली असून, या खेळाडूंनी जागतिक स्तरावर भारताचा सन्मान वाढवला.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

अशाच प्रकारे महाराष्ट्रात देखील अनेक महिलांनी आपल्या कार्यकर्तुत्वाने आपल्या राज्याचे व - .कमलबाई अजमेर यांचे नाव आदराने घेतले जाते .त्यात धुळे जिल्ह्यातून कै .देशाचे नाव उज्वल केले आहे

**संबोध शब्द**

योगदान, इतिहास, भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान, वेद, उपनिषद, प्रशासक, इतिहास, सिंहासन, स्वातंत्र्य संग्राम, अग्रस्थान, अंतराळशास्त्र, उज्ज्वल, पुरुषप्रधान संस्कृती.

**विषय प्रवेश**

"यत्र नार्यस्तू पूज्यन्ते
रमन्ते तत्र देवता"[१]

भारतीय स्त्री फक्त चुल व मूल यामध्ये रमलेली नसून तिने जागतिक स्तरावर विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवत देशाची प्रतिमा उंचावली आहे. भारत हा पुरुषप्रधान संस्कृती असलेला देश आहे परंतु देशाला आई (माता) म्हटले जाते. स्त्री विविध रुपात नवदुर्गेसारखी आहे.

"तू भार्या, तू भगिनी
तू दुहिता, प्रत्येक वीराची माता
तू नवयुगाची प्रेरणा
या जगताची भाग्य विधाता"[२]

आज जगभरात अनेक महिला विविध क्षेत्रात आपल्या कार्य-कर्तृत्वाने ओळखल्या जात आहेत. आज समाजकारण, अर्थकारण, राजकारण, इत्यादी क्षेत्रात त्या अग्रणी आहेत, थोडक्यात भारताचा इतिहास महिलांच्या शौर्याने, यशस्वितीने भरलेला आहे. अशाच प्रकारचे एक कालजयी व्यक्तिमत्त्व खान्देशातील धुळे शहरात उदयास आले ते म्हणजे – कै. कमलाबाई अजमेरा.

कमलाबाई अजमेरा यांचा जन्म जळगाव जिल्ह्यातील पाळधी या छोट्याशा गावात झाला होता. त्यांचे वडील श्री चुनीलालजी कासट हे आडतीचा व्यापार करत होते. लहानपणी कमलाबाई यांचे नाव 'गंगा' होते. कमलाबाई यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. लहानपण गावी गेल्यामुळे गावातील अनेक गमती–जमती कमलाबाई यांनी आपल्या 'मळा आठवणींचा' या पुस्तकात मांडल्या आहेत.

धुळे हे कमलाबाईंच्या आईचे मामाचे गाव होते. धुळयातील छगनलाल अजमेरा यांच्या सोबत त्या विवाहबंधनात बांधल्या गेल्या. छगनलालजींनी कमलाबाईना जीवन जगण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य दिले. धुळयात झाल्यानंतर कमलाबाईंच्या जीवनाचे, विकासाचे नवपर्व सुरु झाले. सन १९४९ ला त्या सेवादलाच्या महिला विभागाच्या जिल्हा संयोजक बनल्या. त्या काळात त्यांनी अनेक समाजोपयोगी कामे केलेली दिसून येतात. समाजातील अनिष्ठ रुढी–परंपरा, प्रथा बंद व्हाव्यात यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केलेले दिसून येतात. वाईट आणि चांगल्या विचारांच्या माणसासंबंधी त्या म्हणतात, "जिथे वाईट विचारांची माणसे असतात, तिथे चांगल्या विचारांची माणसेही असतातच. इंद्रधनुष्य खुलायला पावसाचा एक थेंबही पुरेसा असतो. प्रकाश किरणांचे त्यातुन परावर्तन झाले की, सप्तरंगी इंद्रधनुष्य आकाशाच्या विशाल प्रांगणात दिमाखाने खुलते, चांगली माणसे समाजात थोडी असली, तरी त्यांच्या चांगुलपणाने समाजात सुखाची इंद्रधनुष्ये खुलविण्याचे त्यांच्यात सामर्थ्य असते."[३]


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

कमलाबाई अजमेरा यांनी कधीही मुलगा-मुलगी असा भेद मानला नाही. तसेच ते हुंडा पध्दतीचा नेहमी विरोध करत असत. त्यासाठी त्यांनी स्वत:ची मुलगी विमलच्या लग्नातही हुंडा दिला नाही. कमलाबाई अजमेरा यांना आपल्या मुलांना चांगले शिक्षण व संस्कार मिळावेत याकडेही लक्ष पुरविले. कमलाबाई अजमेरा यांनी नंतर आपल्या सामाजिक कर्तृत्वाच्या जोरावर आमदारकी ही मिळविली. कमलाबाई अजमेरा यांनी मुलाच्या लग्नाच्या वेळेस हुंडा स्विकारला नाही. असे आदर्श त्यांनी आपल्या कुटुंबापासुनच सुरु केले होते. याच दरम्यान कमलाबाई अजमेरा यांना भारतीय माहेश्वरी महिला परिषदेचे अध्यक्ष पद मिळाले.

कमलाबाई अजमेरा यांनी धुळे जिल्ह्यातील तळागाळातील मुलां-मुलींना शिक्षण मिळावे म्हणून सन १९५६ साली प. खा. भ. सेवा मंडळ, धुळे ची स्थापना करण्यात आली. आज मुली व महिलांच्या शिक्षणाकरिता ही संस्था महाराष्ट्रभर नावाजलेली आहे. परंतु धुळे व नंदुरबार जिल्हा जे आदिवासी जिल्हे म्हणून ओळखले जातात येथे या संस्थेने विशेष लक्ष पुरविलेले दिसते. मुलींनी शिक्षणाच्या प्रवाहात यावे म्हणून कमलाबाई अजमेरा यांनी स्वत:च्या सुनेला पीएच.डी. पर्यंतचे शिक्षण पूर्ण करायला लावले. त्यानंतर संस्थेत सुनेला उपाध्यक्ष ही केले.

मधल्या काळात अनेक दु:खद गोष्टी कमलाबाई अजमेरा यांच्या सोबत घडल्या. त्यांचा लहान मुलगा सुभाष रेल्वेखाली आल्याने मृत्यू पावला. कमलाबाईना खूप दु:ख झाले. दु:खाविषयी त्या म्हणतात, "लोकांना वाटते, समाजकार्य करणारी माणसे कठोर असतात, त्यांच्या ह्दयात मायेचे झरे नसतात. त्यांना पुत्रप्रेम नसते. पुत्र गमाविल्याचे दु:खही नसते. पण खरं सांगू, समाजाचे अश्रू पुसणाऱ्यांना आपले दु:ख अस सामाजिक नाही हो करता येत. दु:खाला डोळयातून वाट मिळाली की, अश्रूंच्या सिंचनाने मनाचा भार हलका होतो."[३]

कमलाबाई अजमेरा यांच्या समाजकार्याची खरी सुरुवात १९४२ ला सेवादलाच्या कामापासून झाली. तेव्हा सेवादलाचे कार्य शिरपूर ला इंदूताई वाघ पाहत होत्या. तर महाराष्ट्र प्रदेश स्त्री संघटनेच्या प्रमुख प्रेमाताई कंटक ह्या होत्या. सेवादलाचे कार्य करतांना कमलाबाई अजमेरा यांनी संपूर्ण खानदेश पिंजून काढल्या. या काळात संपूर्ण महाराष्ट्रभर विविध ठिकाणी सभांना कमलाबाई अजमेरा उपस्थित राहु लागल्या. खानदेशात त्यांचे नाव आदराने घेतले जाऊ लागले.

सन १९४८ साली खानदेश सारख्या आदिवासीपरक पट्यात विधवा विवाहाची त्यांनी क्रांतीमेढ रोवली. कमलाबाई अजमेरा यांच्या मते, "सामाजिक सुधारणा म्हणजे फक्त हुंडा पध्दती, पडदा पध्दत, विधवा पुनर्विवाह, बालविवाह यांच्या विरुध्द झगडणे नव्हे, तर इतर धर्मांबद्दल प्रेम, स्पृश्य-अस्पृश्य भेद न मानणे याचाही यात समावेश आहे."[४] भंगी-मुक्ती चळवळीमधील योगदान उल्लेखनीय आहे. कारण संडास साफ करणाऱ्या महिलेला भाऊबिजेच्या दिवशी ते घरी जेवणाला बोलावत असत. काझी वकिलांना रक्षा बंधनाच्या दिवशी राखी बांधायला जात. अशाप्रकारे कमलाबाई अजमेरा यांचे सामाजिक कार्य जात-पात, धर्म यांच्या पलीकडचे त्यांचे अवर्णनीय कार्य होते.

संपूर्ण महाराष्ट्र आणि विशेषत: खानदेश कमलाबाई अजमेरा यांच्या शैक्षणिक कार्याला विसरु शकत नाही. कारण ज्या काळात शिक्षणासाठी पुणे, मुंबई शिवाय पर्याय नव्हता. कमलाबाई अजमेरा यांनी प. खा. भ. सेवा मंडळ, धुळे ची स्थापना करुन एका नवीन पर्वाला सुरुवात केली. संस्थेतील सदस्या उषाताई भट यांनी १९५९ साली कमलाबाई अजमेरा यांच्या प्रेरणेने नंदुरबार येथे कमला नेहरु कन्या विद्यालयाचा पाया घातला. सन १९६२ ला अध्यापक विद्यालय सुरु करण्यात आले. विधवा भगिनी प्याराबाई सोमाणी यांनी संस्थेला जमिन दान दिली होती म्हणून अध्यापक विद्यालयाला 'प्याराबाई सोमाणी' अध्यापक विद्यालय असे


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

नाव देण्यात आले. आजपर्यंत या अध्यापक विद्यालयातून अनेक विद्यार्थिनी शिकून मोठ-मोठ्या पदांवर कार्यरत आहेत. पुढे अनुताई वाघ यांच्या मदतीने बालमंदिर ही स्थापन केले. पुढे नंदुरबार व धुळे येथे मुलींसाठी माध्यमिक विद्यालयांची स्थापना करण्यात आली.

संस्था, शिक्षण व विद्यार्थी याविषयी कमलाबाई अजमेरा म्हणतात, "संस्था उभ्या करतांना पैसा उभा करणे, विद्यार्थी मिळविणे ह्या समस्या असतातच. सर्वसाधारणपणे विद्यार्थ्यांचा कल नावाजलेल्या संस्थाकडे जाण्याचा असतो. शिक्षण खात्याच्या मदतीने विद्यार्थिनी वाढविणे मला मान्य नव्हते. आपल्या कर्तृत्वाने विद्यार्थिनींना आपल्या संस्थेत यावेसे वाटले पाहिजे, असे माझे मत आहे, आणि म्हणूनच माझ्या संस्थेत कार्य करणाऱ्या सेवकांकडून मी चांगल्या कार्याची अपेक्षा केला आहे. आणि त्यामुळे माझ्या संस्था विकसित होत गेल्या. श्रमनिष्ठा ही यशाची पहिली पायरी आहे."[५]

बालमंदिर, शाळा, विद्यालये, महाविद्यालये तर काढली गेली. संस्था नावारुपास ही आली. विद्यार्थिनींचा कलही वाढु लागला. परंतु सगळयात मोठी समरचा होती निवासाची. कारण त्याकाळी इतकी वाहने नव्हती. म्हणून वस्तीगृह सुरु करण्यात आले. या वस्तीगृहाला इंदिरा गांधी यांचे नाव देण्यात आले. पुढे स्त्रियांच्या पुनर्वसनासाठी 'आपदग्रस्त महिला औद्योगिक केंद्राची' स्थापना करण्यात आली.

कालांतराने पुढे संस्था एस. एन. डी. टी., मुंबई विद्यापिठाशी संलग्न झाली. त्यानंतर मग मुलींसाठी महाविद्यालय काढून त्यांच्या साठी विविध कोर्सेस सुरु करण्यात आले. ज्यात 'फुड न्युट्रिशन, कुकरी', 'होम मॅनेजमेंट', 'संगीत होम सायन्स सर्टिफिकेट' व डिप्लोमा इत्यादी कोर्सेस होते. सन १९८९ साली धुळे चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यामाने आयुर्वेद महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. या आयुर्वेद महाविद्यालयाच्या माध्यमातून कमलाबाई अजमेरा यांनी आरोग्य शिबिरे भरवून गरीब जनतेला मदत केली. कमलाबाई अजमेरा लिहितात, "माझे यजमान कै. दादासाहेब अजमेरा यांच्या स्मृती-प्रित्यर्थ सुरु केलेल्या ह्या हॉस्पिटलमुळे आम्ही गरीब जनतेला मोफत औषधोपचार देऊ शकलो. प्रसुतीगृह, पॅथोलॉजी, सोनोग्रॉफी असे विविध भाग या हॉस्पिटलमध्ये आहेत. तसेच या हॉस्पिटल च्या विद्यमाने विविध प्रकारची रोगनिदान शिबिरे भरवून गरजू गरीब जनतेला मोफत औषधोपचार मिळवू दिले जातात. अद्यावत साधनांनी सुसज्ज असे ऑपरेशन थिएटरही आहे."[६] थोडक्यात कमलाबाई अजमेरा यांच्या दुरदृष्टीमुळे, समाज प्रेमामुळे, आत्मविश्वासामुळे, कार्यनिष्ठेमुळे १९५६ साली लावलेल्या बीजाचे आज वटवृक्षात रुंपातर झालेले दिसून येते, ज्याच्या मी देखील एक सदस्य असल्याचा मला अभिमान वाटतो.

कमलाबाई अजमेरा यांच्या शैक्षणिक कार्याचा वटवृक्ष खालीलप्रमाणे -

**संस्थापक, अध्यक्ष-कमलाबाई अजमेरा**

| विभाग | संस्था/शाखांचे नांव | स्थापना वर्ष |
|---|---|---|
| पालक संस्था | प. खा. भगिनी सेवा मंडळ, धुळे | १९५६ |
| बालमंदिरे | सुभाष अजमेरा बालमंदिर, देवपूर, धुळे | १९६४ |
| | नूतन बालमंदिर, नंदुरबार | १९६७ |
| प्राथमिक शाळा | संजीवनी विद्या मंदिर, देवपूर, धुळे | १९६६ |
| | प्या.ओ. प्राथ. विद्यामंदिर, नंदुरबार | १९६८ |
| माध्य. व उच्च | कमला नेहरु कन्या माध्यमिक व उच्च | १९५९ |
| माध्य. शाळा | माध्यमिक विद्यालय संलग्न व्यावसायिक | |


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

| | | |
|---|---|---|
| | अभ्यासक्रम कोर्स, नंदुरबार. | |
| | कन्या हायस्कूल, देवपूर, धुळे | १९६४ |
| महाविद्यालय | महिला महाविद्यालय, देवपूर, धुळे<br>संलग्न-उच्च माध्यमिक, व्यावसायिक,<br>प्यारा मेडिकल, होमसायन्स,<br>संगीत व कॉम्प्युटर कोर्सेस | १९८३ |
| वसतिगृहे | इंदिरा गांधी वसतिगृह, नंदुरबार | १९६२ |
| | कमलाबाई अजमेरा बालिकाश्रम, धुळे | १९८० |
| | वर्किंग वुमेन होस्टेल, धुळे व नंदुरबार | १९९३ |
| | डे केअर सेंटर्स, शिरपूर व नंदुरबार | १९९२ |
| प्रशिक्षण विद्यालये | प्या.सो. अध्यापिका विद्यालय, धुळे | १९६२ |
| | आपद्ग्रस्त महिला औद्योगिक सेंटर, धुळे | १९८२ |
| | अंगणवाडी प्रशिक्षण केंद्र, धुळे | १९८४ |
| | शिवणकाम सर्टि. व डिप्लोमा कोर्सेस, धुळे | १९६५ ते ८५ |

यानंतर देखील अनेक शैक्षणिक संस्थाचे जाळे त्यांनी तयार केलेले दिसून येतात. याव्यतिरिक्त कमलाबाई अजमेरा यांचा विविध ठिकाणी सक्रिय सहभाग होता तो पुढीलप्रमाणे –

| **विविध संस्था** | **सहयोगी संस्था** | **स्थापना वर्ष** |
|---|---|---|
| धुळे चॅरिटेबल सोसायटी, धुळे | | १९०१ |
| डी. फार्मसी कॉलेज, देवपूर, धुळे | | १९८३ |
| आयुर्वेद महाविद्यालय, देवपूर, धुळे | | १९८९ |
| बी. फार्मसी कॉलेज, देवपूर, धुळे | | १९९४ |
| सहकारी संस्था व इतर | महिला उद्योग सहकारी सोसायटी, धुळे | १९६६ |
| महिला सहकारी ग्राहक भांडार, देवपूर, धुळे | | १९६६ |
| श्रमिक महिला उद्योग सह. सोसायटी, धुळे | | १९६७ |
| इंदिरा सहकारी बँक, धुळे | | १९७२ |
| जानकीबाई ट्रस्ट, धुळे | | १९८४ |
| मुक्तद्वार संस्था, कासोदा जि. जळगांव | | १९९३ |
| कमलाबाई अजमेरा प्रतिष्ठान, धुळे | | १९९४ |
| **औद्योगिक -** | गणेश केमिकल्स इंडस्ट्रीज, डोंबिवली, मुंबई | १९६९ |
| | युनिव्हर्सल स्टार्च फॅक्टरी, दोंडाईचा | १९७३ |
| | विजय इलेक्ट्रीकल्स ॲण्ड असाइड, धुळे | १९८३ |
| | ओम पावर ॲण्ड ट्रान्सफार्मर, धुळे | १९८६ |

कमलाबाई अजमेरा यांनी सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य क्षेत्रासोबतच औदयोगिक क्षेत्रातही आपला ठसा उमटविला आहे. 'उद्यमे वसते लक्ष्मी' या उक्तीनुसार त्यांनी १९६९ साली डोंबिवली याठिकाणी 'गणेश


Copyright © | JET Network, All Rights Reserved

केमिकल्स' ची मुहुर्तमेढ रोवली. नंतर सुरुवातीला अनेक छोट्या-मोठ्या उद्योगधंद्याची उभारणी केली. ज्यात अनेक परिवार आज आपला उदरानिर्वाह करत आहेत.

कमलाबाई अजमेरा यांना प्रवासाची ही खूप आवड होती. त्यांनी त्यांच्या आयुष्यात खूप ठिकाणी यात्रा केली. याविषयी ते लिहितात, "केल्याने देशाटन, पंडित मैत्री सभेत संचार, मनुजा चातुर्य येत असे फार', विविध देशात प्रवास केल्याने विद्वान लोकांशी मैत्री जमते. पुस्तकी ज्ञानापेक्षा अनुभव केव्हाही श्रेष्ठ. विविध देशात जाण्याची संधी आली तर तेथील संस्कृती व जीवन पध्दती, भौगोलिक व ऐतिहासिक महत्त्व, साऱ्याच गोष्टी जाणून घेता येतात. आपल्या अनुभवाचे क्षेत्र विशाल होते. एक नवा दृष्टिकोन व नवी दिशा जीवनाला मिळते."[८] कमलाबाई अजमेरा यांनी बाळासाहेब देसाई यांच्यासमवेत संपुर्ण भारत-दर्शन केले. बद्रीनाथ, केदारनाथ यात्रा, नेपाळ यात्रा, जापान यात्रा, अमेरिका यात्रा, अशा अनेक देशात त्या फिरुन आल्या होत्या.

कमलाबाई अजमेरा आमदार पदी विराजमान असतांना अनेक ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम त्यांनी केले. शासनाच्या 'बालवर्ग' बंद करण्याच्या निर्णयाला त्यांनी कडाडून विरोध केला. 'विधवा-विधुर' विवाहाचा ठराव मांडला. 'द्विभार्या प्रतिबंधक कायदा' याविरुध्द आवाज उठविला. 'रेशनकार्ड' साठी लढा दिला. 'उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव' स्थापन व्हावे यासाठी आंदोलनात सहभागी झाल्या. यादरम्यानच्या काळात कमलाबाई अजमेरा यांचे काँग्रेस वरिष्ठांशी तर चांगले होतेच पण स्थानिक स्तरांवर इलेक्शनपटु चुडामण आनंदा पाटील, त्यांचे चिरंजीव दाजीसाहेब रोहिदास पाटील, शेतीतज्ज्ञ डॉ. विश्राम हरी पाटील, कर्तव्यनिष्ठ अण्णासाहेब व्यंकटराव रणधीर, श्री दादासाहेब राऊळ, मोहनभाई पटेल, श्री उत्तमराव पाटील, जयहिंद ट्रस्ट चे संस्थापक नानासाहेब झुलाल भि. पाटील व किसन जिभाऊ करनकाळ इत्यादींसोबत त्यांच्या कार्याला न्याय देत होत्या.

कमलाबाई अजमेरा यांनी सदैव 'आर्यन लेडी-भारत रत्न इंदिरा गांधी' यांना आराध्य दैवत' मानले होते. कुठलेही कार्य करतांना त्या इंदिराजींचा आदर्श डोळयासमोर ठेवत असत. इंदिरा गांधी यांच्या सोबत काम करण्याची संधी मिळाली हे ते त्यांचे सौभाग्य समझतात. यासोबतच त्यांना मुरब्बी दीर्घानुभवी पंतप्रधान मा. नरसिंहरावजी यांच्या सोबत देखील कार्य करण्याची संधी मिळाली. कणखर नेता श्री मुरारजीभाई देसाई, पंतप्रधान राजीव गांधी, यशवंतराव चव्हाण, शंकररावाजी चव्हाण, वसंतरावजी नाईक, शरदरावजी पवार, वसंतदादा पाटील, श्रीमती ताई कन्नमवार व दादासाहेब कन्नमवार, बॅरि. अंतुले साहेब, स्वरुपसिंगजी नाईक, भाऊसाहेब हिरे, जवाहरलालजी दर्डा इत्यादी. अशा नामवंत, कीर्तिवंत अभ्यासक्रम, समाज सुधारक, राजनीतितज्ज्ञ, आजी-माजी पंतप्रधान, मुख्यमंत्री यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या कमलाबाई अजमेरा यांचे योगदान कालजयी आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की, भारतीय महिलांचा इतिहास केवळ पराक्रमाचा आणि संघर्षाचा नाही, तर प्रेरणेचा आणि विजयाचा आहे. त्यांनी समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात आपली अमीट छाप सोडली आहे. आजही भारतीय महिला सर्व क्षेत्रांत उत्तम कामगिरी करत आहेत. त्यांच्या धैर्य, बुद्धिमत्ता आणि कर्तृत्वामुळेच भारताचा इतिहास समृद्ध झाला आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

१. www.sanskritshlok.co.in
२. www.marathikavita.com


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

३. अजमेरा कमलाबाई, मळा आठवणींचा, का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, १९९५, पृ. क्र. १३
४. कित्ता, पृ. क्र. १८
५. कित्ता पृ. क्र. २९
६. कित्ता, पृ. क्र. ३३–३४
७. कित्ता, पृ. क्र. ३७
८. कित्ता पृ. क्र. ४५


Copyright © | JET Network, All Rights Reserved